शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद अहिल्यानगर
दुरध्वनी क्रमांक :- 0241 2353694
ई-मेल आयडी :- ednprimary@gmail.com
वेबसाईट :- www.eduprimaryanagar.in
पत्ता :- नविन प्रशासकिय इमारत, माळीवाडा, अहिल्यानगर-414001

जा.क्र.कार्या-1/पीई-1/234/2025 अहिल्यानगर, दि. 20 /02/2025

**प्रसिध्दीप्रत्रक**

**विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवार यांना कंत्राटी तत्वावर नियुक्त करणेबाबत ..**

संदर्भ :- 1.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.666/टिएनटि-1, दि. 09 सप्टेंबर, 2024
2.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.666/टिएनटि-1, दि. 23 सप्टेंबर, 2024
3.मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.आस्था-क/प्राथ-106/ 10 प शाळा/ शिक्षक/2024/6127, दि. 07/10/2024
4.या कार्यालयाकडील पत्र क्र.वशि/कार्या-1/पीई-1/1895/2024, दि. 05/12/2024
5.या कार्यालयाकडील पत्र क्र.वशि/कार्या-1/पीई-1/2293/2024, दि. 09/12/2024
6.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.666/टिएनटि-1, दि. 10 फेब्रुवारी, 2025

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार कळविण्यात येते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एका पदावर डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवार यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबत संदर्भ क्र.02 व 03 अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एका पदावर डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार शिक्षक उमेदवाराची कंत्राटी तत्वावर नियुक्तीबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांना सदर्भ क्र.04 चे पत्रान्वये सविस्तर सुचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत.

तथापि मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि. 05/12/2024 रोजीचे व्हि.सी. मध्ये दिलेल्या निर्देशानूसार 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्तीबाबत पुढील आदेश होईपर्यत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये असे निर्देशित केलेबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांना सदंर्भ क्र.05 चे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

विषयांकित प्रकरणी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि. 10 फेब्रुवारी, 2025 चे शासन निर्णयान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एका पदावर डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवार यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबत संदर्भ क्र.01 व 02 येथील शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आलेले आहेत. तरी याबाबत अहिल्यानगर जिल्हयातील सर्व डी.एड., बी.एड. अर्हता धारक उमेदवार यांनी नोंद घ्यावी.

Signed by
Bhaskar Jagannath Patil
Date: 20-02-2025 14:15:55

(भास्कर पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

**अहिल्यानगर जिल्हयातील**
**डी.एड., बी.एड. अर्हताधारक उमेदवार**

प्रत :- 1.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
2.गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)